Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील निवडक लोकगीतांतून आलेले समाजजीवन

**प्रा.डॉ.पंडीत रानमाळ**
मराठी विभाग, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

जेव्हापासून लिखित वाड्:मय उपलब्ध आहे. तेव्हापासून सर्व वाड्:मयात लोकगीताचे उल्लेख आढळतात. भारतात लोकगीतांची परंपरा खूप प्राचीन आहे. समाजामध्ये मौखिकतेने लोकगीते प्रचलित होती. लोकगीतामध्ये सतत काळ, परिस्थितीमुळे सतत बदल होत गेला.त्यामुळे त्याचे मूळ स्वरपात स्थळ-काळानूसार बदल झालेला आपणास आढळतो. त्या त्या प्रदेशाचे रुढी, परंपराचे प्रतिबिंब निरनिराळ्या स्वरुपात आलेले आहे.

मौखिक साहित्याचा एक भाग लोकगीताचा आहे.यालाच विधीगीते म्हणतात. माणूस निरनिराळ्या पातळ्यावर व्यक्त होऊ लागला व गाण्याची निर्मिती झाली.दैनदिन जीवनात माणसे एकत्र येतात.त्यांना काही बोलावेसे वाटते. ते गद्य पद्य स्वरुपात व्यक्त होऊ शकते. कविता ही एखाद्याचा अनुभव व्यक्त करते. गीत हे अनेकांनी मिळून सादर केलेली, मुद्दाम गायलेली रचना असते. काही जमातीमध्ये माणसाच्या मृत्यूनंतर गीत गायले जाते. हे विधिगीत असते.त्यातील भाव सार्वत्रिक असतो. सर्व मानवी जीवनांवर गीते आढळतात. लोकगीताचे लोकगीते व लोककथा गीते असे भाग पडतात. लोकगीते मनोरंजनपर,श्रमपरिहार,भावनांचा आविष्कार,उपासनापर,धार्मिक विधीसाठी,नीती- बोधा साठी ही लोकगीते गाईली जातात.

महाराष्ट्राच्या सर्वदूर भागातील कृषीसंस्कृतीत विधी पाहावयास मिळतात. वेगवेगळ्या भागात विधीच स्वरुप हे प्रदेशापरत्वे बदलतं. हा बदल भूप्रदेश पिकं, माणसाच्या गरजा, उपलब्ध साधन- सामुग्री,पारंपारिक धारणा, रुढ लोकविश्वास यांच्या स्वरुपानुसार होत असतो, असं असलं तरी कुठलीही कृषिसंस्कृती ही विधीशिवाय समृध्द झालेली दिसत नाही

मराठवाड्यातील एक अशाच एका कृषिविधीचं स्वरुप म्हणजे ‘वाफ धावणी’ होय.या विधीसमयी शेतकरी स्त्रीया काही गाणी गातात. जालना जिल्हयामध्ये शेतकरी ही ‘वाफ धावणी’ विधी पेरणीच्या वेळेस करतात.पेरणीच्या अखेरच्या दिवशी तिफणीची पूजा करण्याचा विधी केला जातो. यालाच ‘वाफ धावणी’ असे म्हणतात. ज्वारीचा दाणा हा खोलवर पडावा म्हणून मातीचा पेंड बांधला जातो.पेरणी संपल्यानंतर तो काढला जातो जाड, जू, नळे, एठण सोडल जाते त्यांना तेल पाजल जात. नळे साफसुफ करुन ठेवली जातात. या तिफणीच्या अवजाराची पूजा केली जाते.शेतात ही पूजा पेरणीच्या शेवट झाल्यानंतर केली जाते. पेरणीच्या कामात जी माणसे

सहभागी असतात. त्यांना जेवण दिलं जात व पाहुणे-राहुळ्यांना आवतन दिल जातं. याला 'वाफ धावणी' म्हणतात. यावेळी घरातील-गावातील स्त्रीया काही गाणी म्हणतात.

राज्यान परजा मिळून दोघं
कडल घेऊन SS
माय कडल घेऊन SS
नांगर वर वर धरुन यानं
हानली हो तिफण SS
बरमा,इस्नू,महिस आणिक
फारोळे तीन
या तिफणी कारण
नांगर वखर धरुन यानं
हानली हो तिफण SS
साईत्री,लक्ष्मी,पारबती
नळ्या संगीन
या तिफनी कारनं
नांगर वखर धरुन यानं
हानली हो तिफन SS
जमीन पाहून बी पेरलं
कुनबी राजानं
या तिफनी कारनं
नांगर वखर धरुन यानं
हानली हो तिफन SS

अशाप्रकारे शेतकरी 'वाफ धावणी ' हा विधी साजरा करतात.

शेतकरी जीवनातं शेत-शिवार फूलून आल्यानंतर आनंदाने,उत्सवाचे वातावरण असते.लातूर जिल्हयातील अशाच एक विधी म्हणजे 'येळो आमोशा'हा होय. उस्मानाबाद, लातूर, उमरगा या परिसरामध्ये ग्रामीण भागात हा विधी साजरा होतो.मार्गशीर्ष महिन्यातील अमावस्येला हा विधी साजरा केला जातो.घरातील बायका-मुलं सकाळीच स्वयंपाकाच्या तयारीनिशी शेतात जातात.रब्बीचे पिके शेतात डोलताना दिसतात.शेतात एखाद्या झाडाखाली,पडीक

जागेवर जागा साफसूफ करुन पाच पेंड्याची कडब्याची एक कोपी (खोपी) तयार केली जाते.त्याला शाल,कपड्याने झाकतात, खोपीची जागा साफ करतात.काळ्या मातीच पाट करतात. मातीच्या चिखलाच्या पाच लक्ष्म्या करतात. त्यांना हळद-कुंकू,रानातील फूल वाहून पूजा करतात. गोड भात,आंबट,तिखट भात, बारा भाज्या एकत्र करुन शिजवून केलेली भाजी अशा प्रकारचा नैवेद्य केला जातो. याप्रसंगी पाहूण्यांना, गावातील आलुतेदार, बलुतेदार यांना जेवणाचे निमंत्रण दिलेले असते. बाजरीचे रोडगे, कण्या, भजे आंबील, गोडभात बाराभाज्या असे पदार्थ जेवणात असतात.या येळा अमावस्येच्या संदर्भाने काही स्त्रीयांनी गाणी पाहावयास मिळतात.उदा.

आली आली लक्षीमी / सोन्याच्या पावलानं
इळा आमोशाच्या दिसी / कोप चढे डौलानं
इळा आमोशाच्या दिसी / जाई जुईचा मांडव
तेथ लक्षीमी/ हिंडते शिवारानं
अंगावरल पातळ / ओल झालं वदाडानं
शेतातली लक्षीमी / हिंडते शेतो शेत
कुणब्या तुही काय रीत / पाणी नाही घागरीत
शेतातली लक्षीमी / धूऱ्याचा बांध चढ
भरली घागर कोपी पुढं / हाती गोंदन पायापड.

अशी गाणी 'येळा आमोशा' विधीच्या प्रसंगी गाईली जातात. पाऊस पडत नसल्यास गावामध्ये 'पाणी' मागण्याचा विधी ही पुरुष मंडळी करतात.अंगावरील कपडे काढून,लिंबाच्या डहाळ्या बांधून पाणी मागण्याची प्रथा आहे.

'मसणजोगी' ही एक परंपरेने मागते उपासक, महाराष्ट्रामध्ये लोकसंस्कृतीचे उपासक म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. मसणजोगी हा शंकराचा उपासक.स्मशानभूमीमध्ये आपला राहण्याचा 'निवारा'शोधणारा. शंकराचा उपासक महादेवाने आपल्या अंगाला समुद्र मंथरनाच्या वेळी स्मशानातील राख लावून घेतली होती.म्हणून हे महादेवाचे भक्त, महादेवराच्या भूत-पिशाच्च गणाचा हा एक लोकप्रतिनिधी,लोक मानसाच्या भीतीचं स्थान घालवून देणारा महादेवाचा भक्त म्हणजे मसणजोगी.

डोक्यावर विविध देवदेवताचे पितळी मुकूट, कपाळावर विभूतीचे पट्टे, वाढलेल्या दाढी-मिशा, कानात कुंडल,हातात शंख, दूसऱ्या हातात ढणमन वाजणारी मोठी घंटा, शंखनाद करत भिक्षेसाइी निघणारा 'मसणजोगी.' जालना जिल्हयातील एका मसणजोग्याच्या मुलाखतीतून व्यक्त झालेल्या भावना व गीत पुढे व्यक्त केले आहे. तेहतीस कोटी देवाचे नामस्मरण आम्ही करतो, धर्माचे विकून खावू नये म्हणून धान्य घेत नाही. पाचमुखी

शंखवाजवणे,चांदसूर्य फेटा घालून आत्मा-परमात्मा,परमेश्वराची सेवा करणे हेच आमचे काम होय.जत्रेच्या ठिकाणी भगवंत असतो. बाहेर बाधा, झटके येणे,ते नाहीसे करणे, मनातील भीती नाहीशी करणे हे काम आम्ही करतो असे त्यांनी सांगितले.लोकांची दान प्रवृत्ती कमी झाली ही यांतही ते व्यक्त करतात.आमची मूल ही आता शिक्षण घेऊ लागली आहेत अशा आशावाद ही ते बोलून दाखवतात.पहाटेच्या पाऱ्याला भिक्षा मागण्याची प्रथा आहे.त्यांच्या गाण्यात वाड-वडिलांचा, देवाचा उध्दार दान झाल्यानंतर म्हणतात.

हर-हरा गंगा
शिव-शंकर पार्वती
भोले-नाथाची भक्ती
काळभैरव नाथाची फेरी
गुरु गोरक्षनाथ-मच्छिंद्रनाथ,
कानिफनाथ-आडभंगनाथ,
पैठणचे एकनाथ-औंढ्याचे नागनाथ
परळी वैद्यनाथ-खंदारचे हाजीसर्या,
चांदसूर्या प्रार्थना,त्र्यंबकेश्वर बाबा
ब्रम्हगीरीनाथ, दान पावलं नाथाला ...

असे गुणगुणात गाणे गद्य-पद्य मिश्रित ते गुणगुणतात.त्यांच्या गाण्यात वेगळेपणा दिसून येतो.

मराठवाड्यामध्ये नागपंचमी, होळी या दिवशी किंवा आजही ग्रामीण भागात जात्यावर बसल्या की स्त्रीया ओवी म्हणतात.त्यातून त्यांचे भावूक मन व्यक्त होते. नागपंचमीच्या दिवशी तसेच दुसऱ्या दिवशी सक्रुबाची गाणी फेर धरुन स्त्रीया गातात. त्या गाण्यामध्ये स्त्री जीव्हाळा, मन, कौटुंबिक, माहेर-सासर यांचा उल्लेख येतो.स्त्रीया फेर धरुन गाणी म्हणतात.

ल्येकीच्या आईला नका म्हनूंसा हलकी
ल्येकाच्या आईला कुनी दिलीय पालकी?
ल्येकापरायास ल्येक कशानं झाली उणी
एका कुशीची रत्न दोन्ही SS
लेकीचा जल्म, जशी तांदुळाची गोणी
ज्याची त्यानं नेली, बाप बघतो येड्यावाणी.. .
'पंचमीच्या दिशी नागाला दूध लाहया

औख मागू या भाऊराया
पंचमीच्या दिशी नागोबाला पडत
सोड कुणब्या तुझं औत
पोळ्यापासून पंचमी कीस रोज
नेन्त्या भाऊजी वाट पहाते नितरोज '

अशी नागपंचमीची किती तरी सुंदर गीतेही प्रचलित आहेत.

पंढरपुरचा विठोबा अवघ्या महाराष्ट्रात लाडका. पंढरपूरच्या विठोबा विषयीची मराठी मनाची श्रध्दा लोकगीतातून विशेषत: स्त्रीगीतातून मोठ्या उत्कृटतेने व्यक्त झालेली आढळते. मराठवाड्याला हे दैवत तर अतिशय पूज्यनीय.लाखो भाविक आषाढी-कार्तिकीला वारी करणारे श्रध्दाशील भाविक या भागातून जातात.

पहिली माझी ओवी, पंढरीला पाठवा
देव निजलं उठवा /
पहिली माझी ओवी, पंढरी ऐकू गेली
इठू रुक्माई जागी झाली //
दूसरी माझी ओवी ओवी सारंगधरालरा

रुक्माबाईच्या वराला/
दुसरी माझी ओवी दूधाची भावना
इनंती माझी इठूनारायेणा //
चौथी माझी ओवी,गाते माझीया माहेरा
पाडुरंगाच्या पंढरीला गाईन निरंतरा //
चौथी माझी ओवी गाते पावलापासून
इठू रुक्माई आलं रथात बसून //

अशाप्रकारे स्त्रीच्या ओवीगीतातून पंढरी महात्म वर्णन केलेले दिसते.

मराठवाड्यामध्ये ग्रामीण लोकजीवनात ग्रामदेवताना अतिशय महत्वाचे स्थान आहे. त्या निमित्ताने विविध यात्रेचे आयोजन विविध भागात होते.खंडोबा, सटवाई,विठोबा, विविध देवदेवता, मरीआई, काळूआई इत्यादी देवदेवतांना अनन्य साधारण महत्व आल्याने त्यांच्याविषयीच्या श्रध्दा व्यक्त

करणारी लोकगीते आढळतात. त्यातलाच मरीआईचा भगत म्हणून 'पोतराज' मानला.आषाढ महिन्यामध्ये मरीआईची यात्रा अनेक भागात मराठवाड्यात खेडेभागात निघते.गावामध्ये रोगराई निर्माण होऊ नये म्हणून मरीआईकडे एक ग्रामदेवता म्हणून पाहिले जाते.तेव्हा मरीआईचा भगत म्हणून 'पोतराज' हा खेड्यामध्ये भीक मागताना आढळतो. मरीआईच्या यात्रेत पोतराजाची भूमिका महत्वाची असते. पारंपारिक वेषभूषेत हलकीच्या तालावर नाचत नाचत तो गाणी म्हणतो व भिक्षा मागत असतो.

आली आली मरी माय /
कोण्या राजाला पावली //
ध्वजा मोत्याची लावली /
धूरपमा माय //
मरी माय, मरी माय, दहीभात खाती माय
शिवावर राहती, गावाच राखण करती
हिरवी चोळी घालती, हिरव्या बांगड्या घालती
मरी माय मरी माय, दहीभाताचा निवद खाती //

अशा प्रकारे पोतराज हा गीत गातो.त्याचे हे गीत गद्य-पद्य मिश्रित,कडाक्याच्या साथीने तो गात असतो.मराठवाड्यामध्ये 'पोतराज ' हा मरीआईचा भगत म्हणून मानला जातो.नृत्य व नृत्याला गीताची जोड असे स्वरुप पोतराजाच्या गाण्याचे आहे.

अशाप्रकारे मराठवाड्यातील लोकगीतातून लोकजीवन व लोकसंस्कृतीचे तसेच धार्मिक,सामाजिक लोकमनाचे दर्शन घडते.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. लोकसाहित्य : डॉ. प्रभाकर मांडे
२. लोकवाड्:मय रुप-स्वरुप : डॉ. शरद व्यवहारे
३. लोकसाहित्य- रंग व रेषा : डॉ. शरद व्यवहारे
४. स्त्री -गीताची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी : विद्या व्यवहारे
५. लोकपरंपरा-लोकधारी : संपा.परशुराम गिमेकर
६. लोकधर्मी नाट्याची जडण घडण: डॉ.शरद व्यवहारे
७. लोकसाहित्य (संकल्पना व स्वरुप) : डॉ.शरद व्यवहारे